SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416004, MAHARASHTRA

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर-४१६००४ महाराष्ट्र

वेबसाईट : www.unishivaji.ac.in

E-mail : appointment.a@unishivaji.ac.in & appointment.b@unishivaji.ac.in

दूरध्वनी :– 2609102, 2609103

Estd.1962
NAAC 'A' Grade

संदर्भ क्र. शिवाजी वि./परीक्षक नियुक्ती/आरव्हीसी/402 दि. 7 DEC 2020

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक/अधिविभागप्रमुख
सर्व सलंग्नीत महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था/विद्यापीठ अधिविभाग
**(एम. बी. ए./बी.बी.ए./बी.सी.ए. अभ्यासकम)**

**विषयः उन्हाळी 2020 मधील विषम सत्राच्या परीक्षेच्या नियोजनाबाबत.**
**(अंतिम वर्ष/अंतिम सत्र वगळून) (फक्त एम.बी.ए./बी.बी.ए./बी.सी.ए. अभ्यासकम)**

**संदर्भः शिवाजी वि./परीक्षक नियुक्ती/आरव्हीसी/392, दि. 27 नोव्हेंबर, 2020 चे पत्र.**

**महोदय/महोदया,**

विद्यापीठ अधिकार मंडळाच्या ठरावानुसार उन्हाळी 2020 मधील सर्व अभ्यासक्रमासाठी विहित प्रकियेद्वारे परीक्षा शुल्क भरलेल्या **(अंतिम सत्र/अंतिम वर्ष परीक्षा वगळून)** पुर्नपरीक्षार्थी विद्यार्थ्यांच्या (Repeater Students) **विषम सत्राच्या** परीक्षा समन्वयक महाविद्यालय/अधिविभाग स्तरावर/मार्फत परीक्षेच्या आयोजनाबाबत उपरोक्त संदर्भीय पत्रानुसार कळविणेत आले आहे. तथापि, सदर समन्वयक महाविद्यालये व परीक्षा यामध्ये काही बदल करण्यात आलेले असून त्यानुसार समन्वयक महाविद्यालये यांनी परीक्षा आयोजित करण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी. समन्वयक महाविद्यालये व परीक्षा यांची यादी खालीलप्रमाणे.

| अ.क. | समन्वयक महाविद्यालयाचे नांव | परीक्षा |
|---|---|---|
| 1 | **कर्मवीर भाऊराव पाटील इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज ॲण्ड रिसर्च, सातारा** | एम. बी. ए./ बी. बी. ए. / बी. सी. ए. अभ्यासक्रम (सर्व सलंग्नीत महाविद्यालये, विद्यापीठ अधिविभाग व दूरशिक्षण अभ्यास केंद्र) |
| 2 | **यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रूरल डेव्हलपेंट कडील सर्व अभ्यासकमाच्या विषम सत्राच्या परीक्षा ज्या त्या अधिविभाग स्तरावर आयोजित करण्यात याव्यात. तसेच** वेळापत्रक तयार करणे, वेळापत्रक प्रसिध्द करणे, प्रश्नपत्रिका तयार करणे व संपूर्ण परीक्षेचे नियोजन करून सुरळीतपणे परीक्षा पार पाडण्यात याव्यात. | |

1. उपरोक्त समन्वयक महाविद्यालय/अधिविभाग यांनी उपरोक्त अभ्यासक्रमाच्या विषम सत्राच्या पुर्नपरीक्षार्थी विद्यार्थ्यांच्या (Repeater Students) परीक्षा दि. 15 डिसेंबर, 2020 ते 31 डिसेंबर, 2020 या कालावधीमध्ये महाविद्यालय/अधिविभाग स्तरावर सुयोग्य (Online/Offline) पध्दतीने घेण्यात याव्यात.

2. उपरोक्त अभ्यासक्रमाच्या पुर्नपरीक्षार्थी विद्यार्थ्यांच्या (Repeater Students) **विषम सत्राच्या** परीक्षेचे वेळापत्रक समन्वयक महाविद्यालय यांनी तयार करून सदर वेळापत्रक ज्या ज्या महाविद्यालयामध्ये संबंधीत विषय शिकविला जातो अशा महाविद्यालयांना पाठविण्यात यावे. सदर वेळापत्रक महाविद्यालय/अधिविभाग स्तरावर प्रसिध्द करण्यात यावे.

3. संबंधीत समन्वयक महाविद्यालय/अधिविभाग यांनी ज्या विषयास विद्यार्थी परीक्षेस बसणार आहेत त्या विषयाच्या प्रत्येकी 03 प्रश्नपत्रिका सेट तयार करून घेणेत याव्यात. समन्वयक महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी त्यामधील एका प्रश्नपत्रिकेची निवड करून सदर प्रश्नपत्रिका ज्या ज्या महाविद्यालयामध्ये संबंधीत अभ्यासक्रम शिकविला जातो अशा महाविद्यालयांना परीक्षेपूर्वी 1 तास अगोदर पाठविण्यात याव्यात. **तसेच समन्वयक महाविद्यालय यांनी प्रश्नपत्रिका तयार करण्यासाठी आवश्यकतेनुसार इतर महाविद्यालयातील शिक्षकांची मदत घेणेची आहे/करणेची आहे.**

4. उपरोक्त अभ्यासक्रमासाठी संबंधीत समन्वयक महाविद्यालयामार्फत वेळापत्रक तयार करणे, वेळापत्रक प्रसिध्द करणे, प्रश्नपत्रिका तयार करणे व संपूर्ण परीक्षेचे नियोजन करून इतर महाविद्यालयांच्या समन्वयाने सुरळीतपणे परीक्षा पार पाडण्यात याव्यात.

5. **सर्व संलग्नीत महाविद्यालये यांनी विद्यापीठाकडून निश्चित केलेल्या समन्वयक महाविद्यालयांशी संपर्क साधून परीक्षेचे कामकाज पाहणारे आपल्या महाविद्यालयातील समन्वयक यांचे नांव, मोबाईल नंबर व अधिकृत ईमेल आयडी इत्यादी माहिती समन्वयक महाविद्यालय यांना देण्यात यावी.**

6. उपरोक्त अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांच्या सर्व परीक्षा 50 गुणांची, 1 तासाची, बहुपर्यायी प्रश्नावली (MCQ) पध्दतीने महाविद्यालय/अधिविभाग स्तरावर होईल. तसेच सदर परीक्षेसाठी कमाल प्रश्नांची मर्यादा ज्या त्या अभ्यास मंडळाने यापूर्वीच्या उन्हाळी अंतिम सत्राच्या परीक्षेसाठी निश्चित केलेल्या पध्दतीनुसार असेल.

7. उपरोक्त अभ्यासक्रमाच्या परीक्षेसाठी प्रश्नपत्रिका तयार करतांना प्रत्येक प्रश्नाच्या खाली/समोर उत्तरासाठी जागा ठेवण्यात यावी.

   उदा. – प्रश्न ............................................................ | योग्य पर्याय |

   A) ----------------- B) ----------------- C) ---------------- D) --------------------

8. उत्तरासाठी √ (टिकमार्क) न करता चौकटीमध्ये उत्तर लिहीण्यात यावे (उदा. A, B, C, D इत्यादी ). तसेच या परीक्षेकरीता स्वतंत्र उत्तरपत्रिका वापरण्यात येवू नये. तसेच विद्यापीठाकडून OMR शीट पाठविण्यात येणार नाहीत.

9. विद्यापीठाकडे प्राप्त होणा–या विद्यार्थ्यांच्या गुणांचे रूपातर (Conversion) आवश्यकतेप्रमाणे विद्यापीठाकडून करण्यात येणार असल्याने प्रश्नपत्रिका महाविद्यालय येथे तपासून जे गुण विद्यार्थ्यांना प्राप्त होतील तेच गुण संगणक प्रणालीमध्ये भरणेचे आहेत. विद्यार्थ्यांच्या गुणाबाबत कोणतीही तक्रार विद्यापीठाकडे येणार नाही याची दक्षता घ्यावी.

10. सदर परीक्षेकामी होणारा खर्च विद्यापीठाकडून देण्यात आलेल्या तसलमात रक्कमेमधून विद्यापीठ नियमानुसार करण्यात यावा.

11. सदर परीक्षेचे कार्यवलन/संचलन/पर्यवेक्षण इत्यादी व परीक्षेच्या अनुषंगाने करावयाची संपूर्ण कार्यवाही संबंधीत महाविद्यालयाचे प्राचार्य यांचे मार्फत करणेची आहे. तसेच कोव्हीड–19 बाबत प्रोटोकॉल बाबत योग्य ती सर्व कार्यवाही करण्यात यावी.

(श्री. ग. र. पळसे)
प्र. संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रतः

1. मा. कुलगुरू/मा. कुलसचिव यांचे कार्यालयास माहितीसाठी
2. मा. प्राचार्य, सर्व संलग्नीत महाविद्यालय (एम.बी.ए./बी.बी.ए./बी.सी.ए. अभ्यासक्रम), यांना माहितीसाठी/योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी
3. मा. अधिविभागप्रमख, एम.बी.ए/वायसीएसआरडी अधिविभाग
4. सर्व उपकुलसचिव/सहा.कुलसचिव/समन्वयक– परीक्षा विभाग
5. आयटी कक्ष – संबंधीत अभ्यासक्रमाच्या परीक्षेकरीता संगणक प्रणालीतून योग्य ती सुविधा उपलब्ध करून दयावी.